Literacy for a Billion

Movie: Chandanachi Choli Ang Ang Jali
Year: 1975

Song: Pavhnya Tujha Rang Kasa

Lyricist: Jagdish Khebudkar

हिरवा शालू हिरवी चोळी
हिरवा चुडा मी ल्याले
लाज लाजून मी
गोरी मोरी झाले गं
गोरी मोरी झाले
लाज लाजून मी
गौरा ताई
गौरा ताई
गौरा ताई

हो...
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
रोज रोज न्यारा तुझा
ढंग कसा रं
ढंग कसा रं
आरं पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
आरं पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं

मिशीवाला पाव्हणा आला पैलवान माझा
गावं सारं मुजरा करी शोभतोय राजा
कोण त्यो
मिशीवाला पाव्हणा आला पैलवान माझा
गावं सारं मुजरा करी शोभतोय राजा

बाहेर याचा दरारा पळती सारी भरारा
बाहेर याचा दरारा पळती सारी भरारा
आन् घरात
घरात बायकोला भिऊन तिची
लुगडी धुतो खसा खसा
लुगडी धुतो खसा खसा
खसा खसा लुगडी धुतो
लुगडी धुतो खसा खसा खसा खसा रं
आरं
आरं पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
आरं पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं

सोहळंवाला पाव्हणा आला
शमवित भारी
भस्म लावून फिरतोय
दिवसाच्या पारी
कोण त्यो
सोहळंवाला पाव्हणा आला
शमवित भारी
भस्म लावून फिरतोय
दिवसाच्या पारी
ओ हो ओ हो वा...
नाटक गाणं शिनेमा
शांतम् पापम् रामा शिवा
नाटक गाणं शिनेमा
शांतम् पापम् रामा शिवा

रात्री
रात्री चोरून तमाशाला जातो
बाई बघून येडापिसा
येडा पिसा बाई बघून
बाई बघून येडापिसा येडापिसा रं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं

टोपीवाला पाव्हणा आला
करतो जनसेवा
जागो जागी उद्घाटन
खेपा किती गावा
कोण त्यो
टोपीवाला पाव्हणा आला
करतो जनसेवा
जागो जागी उद्घाटन
खेपा किती गावा
दिवसभर दारूबंदी किर्तनाला आली धुंदी

दिवसभर दारूबंदी किर्तनाला आली धुंदी
आणि मग
लपून माडीवर बाईसंग
बाटली पितो ढसा ढसा
बाटली पितो ढसा ढसा
ढसा ढसा बाटली पितो
बाटली पितो ढसा ढसा
आरं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
रोज रोज न्यारा तुझा
कसा रं
ढंग कसा रं
आरं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं
पाव्हण्या तुझा रंग कसा
रंग कसा रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*